**<u>महत्वाचे परिपत्रक</u>**

जा.क्र.कृउसं.विप्र-७/कृ.यां./मासू./४१९/१२
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, साखर संकुल,
शिवाजीनगर, पुणे-४११ ००५
(Email ID - ddapp@rediffmail.com )
दिनांक - ११ /०५ /२०१२

**प्रति,**

**१) विभागीय कृषि सह संचालक,**
**---------- विभाग ----------- (सर्व)**
**२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद --------- (सर्व)**
**३) कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद ----------- (सर्व)**

**विषय - सन २०१२-१३ मध्ये केंद्र पुरस्कृत कृति आराखडया अंतर्गत कृषि यांत्रिकीकरणाची योजना राबविण्यासाठी अंतरीम मार्गदर्शक सूचना.**

**संदर्भ :** १) शासन निर्णय क्र.सुकृऔ २०११/प्र.क्र.३१/११-ए, दि.२२/११/२०१२ व दि.१७/३/२०१२
२) कृषि संचालक (नि. व गु.नि.) यांनी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचना
क्र. सीपीएस/सुकृऔ/दरनि-२०११-१२/३८१/गुनि-५/२०११/दि.२८/११/२०११ व दि.२१/३/२०१२
३) शासन पत्र ------------------------- दि.२०/३/२०१२

केंद्र पुरस्कृत कृति आराखडयांतर्गत कृषि यांत्रिकीकरण योजना सन २०१२-१३ मध्ये राज्यात राबविण्यासाठी राज्य शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. त्याचे अधिन राहून पूर्वतयारीच्या दृष्टीने सदर योजनेच्या अंतरीम मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत. त्यानुसार योजनेच्या अमंलबजावणीसाठी नियोजन करण्यात यावे. सदर मार्गदर्शक सुचना सद्यस्थितीतील केंद्र/राज्य शासनाच्या धोरणांनुसार असून त्यात काही धोरणात्मक बदल झाल्यास त्याचे अधिन राहून अनुषंगीक बदल आपणास वेळोवेळी कळविण्यात येतील. योजनेचा शासन निर्णय प्राप्त झाल्यानंतर अंतीम मार्गदर्शक सुचना व प्राप्त अनुदानानुसार सुधारीत भौतिक/आर्थिक लक्षांक निर्गमीत करण्यात येईल. योजनेच्या मार्गदर्शक सुचना याच तांत्रीक मंजूरी समजण्यात याव्यात.

**स्वाक्षरीत/-**
**संचालक**
**(विस्तार व प्रशिक्षण)**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५**

प्रत
१) मा. प्रधान सचिव (कृषि व पणन), कृषि पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.
२) कक्ष अधिकारी, ४-अे, कृषि पदुम मंत्रालय, विस्तार मुंबई-३२ यांना माहितीस्तव सस्नेह अग्रेषित.
३) मा. व्यवस्थापकीय संचालक, यांना माहितीस्तव व कार्यवाहीस्तव सविनय सादर.
अ) महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ, राजन हाऊस, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५
ब) महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ, कृपानिधी, ९ वालचंद हिराचंद मार्ग, बालार्ड इस्टेट, मुंबई ४०० ००१
क) महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन लि., कमनूर हाऊस, नरसी नाथा स्ट्रीट, मुंबई - ४०० ००९
४) प्रत माहितीस्तव पुढील अनुषंगीक कार्यवाहीस्तव रवाना
अ) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी --------------------- (सर्व)
ब) कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद ---------------- (सर्व)
८) कृषि उपसंचालक विप्र - १/२/३/४/५, गुनि ५ यांना माहीती व अनुषंगीक कार्यवाहीसाठी

http://mahaagri.gov.in/

**<u>सन २०१२-१३ केंद्र पुरस्कृत कृति आराखडया अंतर्गत कृषि यांत्रीकीकरण योजना अंतरीम मार्गदर्शक सूचना</u>**

**पार्श्र्वभूमी** - महाराष्ट्र राज्याची ग्रामीण अर्थव्यवस्था प्रामुख्याने कृषिवर आधारीत असून दिवसें दिवस शेती कामासाठी मजुरांची भासणारी कमतरता, मजुरी वरील वाढता खर्च इ. मुळे शेतीमध्ये सुधारीत कृषि औजारे, उपकरणे, संयंत्रे यांचा वापर अनिवार्य झाला आहे. मजुर समस्येमुळे शेती मशागतीची कामे वेळेवर होत नाहीत व पर्यायाने पिकांचा उत्पादन खर्चही वाढतो. या बाबी विचारात घेवून कृषि यांत्रीकीकरणास प्रोत्साहन देण्यासाठी केंद्र व राज्य शासनाने मंजूर केलेली ट्रॅक्टरचलित/स्वयंचलित, बैलचलित अवजारे अनुदानावर शेतक-यांना वाटप करण्यासाठी केंद्र पुरस्कृत कृषि यांत्रीकीकरण योजना सन २०१२-१३ मध्ये राज्यात सर्व जिल्ह्यात राबविण्यात येईल. सदर योजनेखाली केंद्र शासनाने मंजूर केलेल्या २५ ते ५० टक्के अनुदान मर्यादेनुसार कृषि अवजारे व सयंत्रे यांचा अनुदानावर पुरवठा करावयाचा आहे. सदर योजना क्षेत्रीय स्तरावर राबविण्यासाठी खालीलप्रमाणे अंतरीम मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

**<u>योजनेचा कालावधी</u>** – १ एप्रिल २०१२ ते ३१ मार्च २०१३

**<u>प्रमुख उद्दिष्टे</u>** - १) शेतमजूर समस्येवर पर्याय उपलब्ध करणे, शेती कामाचा वेळ वाचवून मशागतीचा खर्च कमी करणे. २) कृषि यांत्रिकीकरणास प्रोत्साहन देवून पिक उत्पादन खर्चात बचत करणे. ३) पिक उत्पादनात वाढ करणे.

**<u>अमंलबजावणी स्तर व कार्यपध्दती</u>** - योजनेच्या अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरावर कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद हे अंमलबजावणी अधिकारी राहतील. योजनेच्या अंमलबजावणीसाठी खालीलप्रमाणे कार्यपध्द्ती अवलंबावी,

**१) <u>प्रसिध्दी</u>** - योजनेबाबत विविध प्रसिध्दी माध्यमातून व्यापक प्रमाणात प्रसिध्दी द्यावी, जेणेकरुन सर्व शेतक-यांना योजना समजू शकेल. तसेच, योजनेचा तपशील ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद येथील नोटीस बोर्डवर शेतकर्यांच्या माहितीसाठी लावावा. कृषि विभागामार्फत घेण्यात येणा-या विविध शेतकरी मेळाव्यात, प्रशिक्षण कार्यक्रमात कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांनी सदर योजनेच्या प्रसिध्दीची कार्यवाही करावी.

**२) <u>लाभार्थी निवडीचे निकष</u>** - (१) लाभार्थीच्या स्वतःचे नावे शेत जमीन, ७/१२ व ८-अ उतारा असणे आवश्यक आहे. (२) लाभार्थी निवडतांना लहान, सिमांतिक, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या विमुक्त जाती, महिला, अपंग या प्रवर्गातील लाभार्थ्यांना शासनच्या प्रचलीत धोरणानुसार प्राधान्य द्यावे.

**३) <u>तालुकास्तर कार्यवाही</u>** - गट विकास अधिकारी/कृषि अधिकारी, पंचायत समिती यांनी योजनेस प्रसिध्दी देवून इच्छूक शेतक-यांचे अर्ज मागवावेत. प्राप्त अर्जाची निकषांनुसार छानणी करुन पात्र ठरणारे अर्जांची प्राप्त दिनांकानुसार क्रमवारी लावावी. प्रथम प्राप्त प्रथम प्राधान्य या तत्वानुसार आलेल्या प्रस्तावाची नोंद घेण्यात यावी. अपात्र ठरणा-या अर्जांबाबत संबंधीतांना तसे तात्काळ लेखी कळवावे. उणीवांची पूर्तता करुन परिपूर्ण अर्ज प्राप्त झाल्यास तो प्राप्त दिनांकानुसार क्रमवारीत धरावा. पंचायत समितीस प्राप्त लक्षांकानुसार पात्र ठरणारे अर्ज कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांना सादर करावेत. पूर्वतयारीच्या दृष्टीने सदर कार्यवाही करुन अर्जांची छानणी करुन ठेवावी, जेणेकरुन योजनांतर्गत लक्षांक प्राप्त होताच गट विकास अधिकारी यांना पात्र अर्ज शिफारस करणे शक्य होईल. या प्रक्रीयेत काही उणीवा राहील्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी गट विकास अधिकारी/कृषि अधिकारी, पंचायत समिती यांची राहील.

**४) <u>जिल्हास्तर कार्यवाही</u>** - जिल्हयाच्या सर्वंकष कृषि विकास आराखडयात योजनेचा समावेश करावा. कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांनी पंचायत समिती मार्फत इच्छूक शेतक-यांचे अर्ज प्राप्त करुन घ्यावेत. प्राप्त अर्जांची छाननी करून प्राप्त दिनांकानुसार क्रमवारी लावावी व प्रथम प्राप्त प्रथम प्राधान्य या तत्वानुसार आलेल्या प्रस्तावाची नोंद घेण्यात यावी व लक्षांकानुसार लाभार्थीस पूर्व संमती द्यावी. जिल्ह्यासाठी प्राप्त भौतिक व आर्थिक लक्षांकाचे आधीन

http://mahaagri.gov.in/

राहूनच पूर्व संमती देण्याची दक्षता घ्यावी. अपात्र ठरणा-या अर्जाबाबत संबंधीतांना तसे तात्काळ लेखी कळवावे व उणीवांची पूर्तता करुन परिपूर्ण अर्ज प्राप्त झाल्यास तो प्राप्त दिनांकानुसार क्रमवारीत धरावा. पूर्वसंमती दिलेल्या अर्जांची जिल्हा परिषद स्तरावर नोंद वहीत नोंद करावी. कृषि विकास अधिकारी जिल्हा परिषद यांनी संबधित पुरवठा संस्थेस पुर्वसंमतीची प्रत पाठवावी.

शासन पत्र दि.२०/३/२०१२ नुसार सन २०१२-१३ करीता कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांनी प्राप्त प्रस्तावांचा औजार निहाय प्राधान्य क्रम लावून जिल्ह्यासाठी दिलेल्या आर्थिक/भौतिक मर्यादेतच लाभार्थ्यांना लाभ द्यावा. कोणत्याही परिस्थितीत अतिरिक्त प्रस्ताव स्विकारुन ते प्रलंबीत ठेवू नयेत. त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत कृषि विकास अधिकारी यांची राहील.

पूर्व संमती देतांना व योजनेचा लाभ देतांना शासनाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार अनुसुचित जाती/नबबौध्द व अनुसुचित जमाती, महीला, अपंग इत्यादी प्रवर्गातील लाभार्थीकरीता निर्धारीत केलेल्या मर्यादेनुसार लाभ देण्याबाबत काटेकोरप्रमाणे अंमलबजावणी करावी. या प्रक्रीयेत काही उणीवा राहील्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत कृषि विकास अधिकारी जिल्हा परिषद यांची राहील.

**५) <u>पूर्वसंमती</u>** - यापूर्वीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार पॉवर टिलर व रोटाव्हेटरसाठी तसेच ट्रॅक्टरसाठी शेतक-यांनी पुरवठा संस्थेकडून अथवा पुरवठादार संस्थांच्या मध्यस्थीशिवाय **<u>पूर्व संमतीच्या अधीन</u>** राहून बॅक कर्ज प्रकरणाद्वारे खरेदी केल्यास त्यास अनुदान अनुज्ञेय आहे. त्यानुसार पुरवठादार संस्थांनी लाभार्थ्यांना औजारे/सयंत्रे इत्यादीचा पुरवठा करावा व त्यांनी या पुरवठयानुसार पुरवठयाची बिले, डीलेव्हरी चलन, रक्कम प्राप्त झाल्याचा तपशील व पुरवठा पूर्व गुणवत्ता तपासणी व पुरवठयानंतर क्षेत्रीय गुणवत्ता तपासणी अहवाल इ. सह परिपूर्ण प्रस्ताव कृषि विकास अधिकारी जिल्हा परिषद यांचेकडे सादर करावेत. संबधीत कृषि विकास अधिकारी यांनी प्राप्त प्रस्तावांची आठ दिवसात छाननी करावी व सदर प्रस्तावांस जिल्ह्यासाठी प्राप्त भौतिक व आर्थिक लक्षांकाचे आधीन राहून मान्यता देण्यात यावी.

**६) <u>औजारांची निवड व मागणी नोंदविण्याची कार्यपध्दती</u>** - कृषि औजारांच्या निवडीबाबत सर्वतोपरी पारदर्शकता ठेवण्याचे दृष्टीने जिल्हा/तालुका स्तरावर गठीत करावयाच्या समितीचे अनुषंगाने कृषि संचालक (नि. व गु. नि.) यांनी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार कार्यवाही करणे बंधनकारक राहील. औजारांचा वेळेवर पुरवठा होण्याचे दृष्टीने कृषि विकास अधिका-यांनी कामाचे नियोजन करुन वेळेत शासन नियुक्त पुरवठा संस्थांकडे मागणी नोंदवावी. कृषि यांत्रीकिकरण योजनांतर्गत पुरविण्यात येणारी कृषि औजारे/सयंत्रे शासनाने निर्धारीत केलेल्या दराने शासन नियुक्त पुरवठा संस्थामार्फत पुरविण्यात येतीलशेतक-यांची मागणी नसलेल्या औजारांची मागणी कोणत्याही परिस्थितीत नोंदवू नये. अशा प्रकारे औजारांची मागणी नोंदवून ती हंगामा नंतरही विनावाटप पडून राहील्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत कृषि विकास अधिकारी यांची राहील व त्याची रक्कम एक रकमी संबंधीतांकडून वसूल करण्यात येईल.

**७) <u>कृषि औजारे/उपकरणे अनुदान मर्यादा</u>** -

१. सन २०१२-१३ मध्ये उपलब्ध होणारा केंद्र व राज्य हिस्स्याचा निधी ट्रॅक्टर, ट्रॅक्टरचलित औजारे, बैलचलित औजारे व स्वयंचलित औजारे, केंद्र/राज्य शासनाने मंजूरी दिलेली महिला व शेतमजूर यांचे साठी लागणारी औजारे, कृषि पंप, फलोत्पादन औजारे यांच्या अनुज्ञेय अनुदाना करिता वापरण्यात यावा. **सन २०१२-१३ करिता उपलब्ध होणा-या अनुदानातून त्याच वित्तीय वर्षात खरेदी केलेल्या औजारांना/उपकरणांना अनुदान** अनुज्ञेय **राहील.**

**२. ट्रॅक्टर्स** - केंद्र शासनाकडील सोबत जोंडलेल्या मान्यता प्राप्त यादीतील ट्रॅक्टरसाठी किंमतीच्या २५ टक्के किंवा जास्तीत जास्त ४५,०००/- अनुदान अनुज्ञेय राहील. सदर अनुदान ४० अश्र्वशक्तीपर्यंतच्या ट्रॅक्टर्सना अनुज्ञेय राहील.

**३. पॉवर टिलर व रोटाव्हेटर** - शेतक-यांना त्याच्या पसंतीनुसार,संबधीत पुरवठादार संस्थांच्या मध्यस्थीशिवाय, शासन निर्णय क्र. सुकृऔ.२०१०/प्र.क्र.१३५/११ ए कृषि व पदूम विभाग मंत्रालय मुंबई ३२ दि ३ ऑगस्ट २०१० शासन

निर्णयात नमूद केलेल्या उत्पादकांढून पॉवर टीलर व रोटाव्हेटर यांची थेट खरेदी करण्याची मूभा राहील. परंतू बॅक कर्ज प्रकरणाव्दारेच सदर खरेदी बंधनकारक राहील. अशा प्रकरणी संबधीत शेतक-यांनी खरेदी पुर्वी संबधीत कृषि विकास अधिकारी जिल्हा परिषद यांची पूर्व संमती घेणे बंधनकारक राहील. पॉवर टिलरर्ससाठी केंद्र हिश्याचे अनुदान किंमतीच्या ४० टक्के किंवा उच्चतम मर्यादा रु. ४५,०००/- पैकी किमान प्रमाणे अनुज्ञेय राहील.

**४. ट्रॅक्टरचलित/बैलचलित/स्वयंचलित औजारे व महिलांसाठी औजारे, कृषि पंप फलोत्पादन औजारे** - केंद्र शासनाने मान्यता दिलेली व राज्य शासनाने दर निश्चिती केलेली सुधारीत कृषि औजारे /संयंत्रे यांना अनुदान अनुज्ञेय असून औजारांसाठी अनुदानाची टक्केवारी व उच्चतम मर्यादा केंद्र शासनाने निश्चित केलेल्या प्रमाणे खाली दर्शविल्याप्रमाणे राहील.

**केंद्र शासनाचे मार्गदर्शक सुचनांनुसारअनुदानाची उच्चतम मर्यादा दर्शविणारे प्रपत्र सोबत सहपत्रीत केले आहे.**

या योजनेंतर्गत निवड केलेल्या व लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांची बाबानिहाय यादी तालुका कार्यालये/पंचायत समिती, जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हा परिषद कार्यालयात लावावी. तसेच कृषि विभागाच्या सांकेतीक स्थळावर उपलब्ध ठेवावी.

८. **<u>औजारे पुरवठा व गुणवत्ता नियंत्रण</u>** - शासन नियुक्त पुरवठा संस्थांनी मागणीनुसार औजारांचा पुरवठा शासन निर्णयात नमुद केल्यानुसार कालमर्यादेत करावा. पुरवठा संस्थांनी पुरवठा पूर्व तपासणी करणे व मागणी नोंदविणा-या अधिका-यांनी पुरवठा पश्चात गुणवत्ता तपासणी करणे बधनकारक राहील. याबाबत संदर्भीय शासन निर्णय व मार्गदर्शक सुचनांनुरुप कार्यवाही करावी. याबाबत कृषि संचालक, (निविष्ठा व गुण नियंत्रण) यांनी खरेदी प्रक्रीया व औजारांची स्पेसीफिकेशन्स व गुणवत्ता तपासणी इत्यादी बाबत वेळोवेळी निर्गमीत केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यक्रमाची काटेकोर अंमलबजावणी करण्याची जबाबदारी कृषि विकास अधिकारी यांची राहील. औजारांच्या गुणवत्तेबाबत तक्रारी निर्माण झाल्यास सदर औजारांची आवश्यकतेनुसार दुरुस्ती करणे/बदलून देणे पुरवठा संस्थांना बंधनकारक राहील.

९) **<u>अनुदान व देयके अदायगीची कार्यपध्दती</u>** - या योजनांतर्गत लाभधारकांना अनुदानावर औजारे पुरवठा करताना अनुदान वजा जाता उर्वरीत रक्कम रोखीने वसुल करावयाची आहे. कृषि आयुक्तालयाचे परिपत्रक क्र.जा.क्र.कृषि/१६ सीबीसेल/ लाभार्थी/४७०/२०१२, दि.१२/०३/२०१२ अन्वये निर्गमित केलेल्या सुचनांनुसार ज्या योजनांसाठी लाभार्थी हिश्श्याची रक्कम संबंधितांकडून (लाभार्थी) रोख अथवा डी.डी. स्वरुपात वसुल करण्यात येते त्या रकमेची लाभार्थ्यांना शासकीय जमा पोचपावती देण्यात यावी. तसेच, वसुल केलेली रक्कम अथवा डी.डी. तात्काळ संबंधित कर्मचार्यांनी त्यांच्या कार्यालयातील रोखपालाकडे जमा करावे. रोखपालाने या रकमेची नोंद रोखवही मध्ये घेवून कार्यालयाच्या आहरण व संवितरण अधिकार्यांच्याबँक खात्यात त्वरीत जमा करावी. याप्रमाणे कार्यवाही न केल्यास ती वित्तीय अनियमीतता समजून संबधीत मागणी नोंदविण्या-या अधिका-या विरुध्द प्रशासकीय कारवाई केली जाईल. लाभार्थी हिश्यासह पुरवठा संस्थेची देयके अदा करणे ही मागणी नोंदविण्या-या अधिका-याची सर्वस्वी जबाबदारी राहील.

१०) **<u>अनुदान प्रस्तावांचे समायोजन</u>** - पुरवठादार संस्थांनी औजारे पुरवठा झाल्यानंतर आठ दिवसात पुरवठयाची बिले, डीलेव्हरी चलन, रक्कम प्राप्त झाल्याचा तपशील व गुणवत्ता तपासणी अहवाल इ. सह परिपूर्ण प्रस्ताव अनुदान मागणी करीता कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांचेकडे सादर करावेत. मागणीनुसार पुरवठा केलेल्या औजारांचे प्रस्ताव भौतिक/आर्थिक मर्यादांचे अधिन राहून विहित विवरण पत्रातच सादर करावेत. (अनुदान समायोजन विवरण प्रपत्र सोबत सहपत्रीत केलेले आहे.) कृषि विकास अधिकारी यांचेकडे प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर त्यांनी गुणवत्ता नियंत्रण व इतर सुचनांचे काटेकोरपणे पालन करुन अनुदान समायोजनासाठी प्रस्ताव विहीत प्रपत्रात महाव्यवस्थापक (कृ.अ.), महाराष्ट्र राज्य कृषि उद्योग विकास महामंडळ, कृषि उद्योग भवन, दिनकराव देसाई मार्ग, आरे मिल्क कॉलनी, गोरेगाव (पूर्व), मुंबई-६५ यांना सादर करावेत. त्यांनी कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांचे कडून प्राप्त होणा-या अनुदान समायोजन विवरण पत्रातील रकाना क्र.१३ मध्ये दर्शविलेल्या लाभार्थ्याचे नावानुसार धनादेश तयार करून संबधीत कृषि विकास अधिकारी यांचेकडे संबधीतांना वितरणासाठी पाठवावेत. कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांचेकडून

http://mahaagri.gov.in/

अनुदान समायोजन विवरण पत्रातील मंजूर केलेल्या अनुक्रमांकानुसार अर्थीक मर्यादेत प्रस्तांवाचे अनुदान समायोजन करणे बंधनकारक राहील. लाभार्थी शेतक-यांचे व पुरवठा संस्थेचे अनुदानापोटी देय रक्कमेचे धनादेश कृषि विकास अधिकारी यांचे मार्फतच वितरीत करण्यात यावेत. तसेच महामंडळस्तरावर झालेले समायोजन दरमहा कृषि विकास अधिकारी यांना व कृषि आयुक्तालयास कळविण्यात यावे. इतर पुरवठादार सस्थांची देय रक्कमही क्रमाने व वेळेवर वितरीत करण्यात दक्षता घ्यावी. त्यात विलंब झाल्यास महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळास जबाबदार धरण्यात येईल. अनुदान समायोजन विवरण पत्राची प्रत कृषि उपसंचालक (वि.प्र.७), कृषि आयुक्तालय यांचेकडे माहितीसाठी पाठवावी.

**११) <u>अनुदानाची द्विरुक्ती</u>** - उपरोक्त योजनेंतर्गत लाभ घेण्या-या लाभार्थीस एकाच औजारासाठी/उपकरणासाठी अन्य योजनांमधून अनुदान न देण्याची दक्षता घेण्यात यावी.

**१२)** या योजनेचे मुल्यमापन त्रयस्थ यंत्रेणे कडून (Third Party Evaluation) करण्यात येईल.

**१३) <u>तपासणी</u>** - योजनांतर्गत कार्यवाहीच्या अंमलबजावणीची खात्री करण्याचे दृष्टीने विभागीय कृषि सह संचालक, अधिक्षक कृषि अधिकारी (वि.कृ.स.सं. कार्यालय), कृषि विकास अधिकारी, मोहिम अधिकारी, जिल्हा परिषद व कृषि विस्तार अधिकारी, कृषि अधिकारी, पंचायत समिती यांनी वेळोवेळी खालील टक्केवारी प्रमाणे तपासणी करणे बंधनकारक राहील,

| | | | |
|---|---|---|---|
| १. | विभागीय कृषि सह संचालक | -- | ०.२५ टक्के |
| २. | अधिक्षक कृषि अधिकारी (वि.कृ स. स कार्यालय) | -- | ०.७५ टक्के |
| ३. | कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, पंचायत समिती संख्येच्या सम प्रमाणांत | -- | ५.०० टक्के |
| ४. | मोहीम अधिकारी (जि.प.)- सर्व पंचायत समिती संख्येच्या सम प्रमाणांत | -- | १० टक्के |
| ५. | कृषि अधिकारी पंचायत समितीस्तर व कृषि विस्तार अधिकारी | -- | १०० टक्के |

विभागीय कृषि सह संचालक, कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, यांनी तपासणी केल्याचे प्रपत्र 'क' मधील मासिक अहवाल कृषि आयुक्तालयास कृषि उपसंचालक, (वि.प्र.-७) कृषि आयुक्तालय, पुणे यांचेकडे पाठवातेत. मोहीम अधिकारी (जि.प.), कृषि अधिकारी, पंचायत समितीस्तर व कृषि विस्तार अधिकारी यांनी तपासणी अहवाल कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांचेकडे सादर करावेत.

**१४. <u>मासिक प्रगती अहवाल</u>** - योजनेचा मासिक प्रगती अहवाल सोबतच्या (प्रपत्र अ व ब) विहीत केलेल्या प्रपत्रात प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यन्त कृषि आयुक्तलयाकडे पाठविण्यात यावा व कृषि आयुक्तालयाने एकत्रित अहवाल प्रत्येक महिन्याच्या २० तारखेपर्यन्त शासनास सादर करावा.

**स्वाक्षरीत/-**
**संचालक,**
**(विस्तार व प्रशिक्षण)**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५**

http://mahaagri.gov.in/

## केंद्र शासनाचे मार्गदर्शक सुचनांनुसार कृषि औजारांसाठी अनुदानाची उच्चतम मर्यादा दर्शविणारे प्रपत्र

| अ.क्र. | कृषि अवजारे/संयंत्रे प्रकार | अनुदानाची उच्चतम मर्यादा (रु.) |
|---|---|---|
| १ | ट्रॅक्टर (४० एच.पी. पर्यंत)<br>(केंद्र शासनाचे मंजूर ट्रॅक्टर यादीनुसार) | किमतीच्या २५ टक्के किंवा रु.४५०००/- |
| २ | अ) पॉवर टिलर(८एच्.पी. पेक्षा जास्त अश्र्वशक्तीचे)<br>ब) पॉवर टिलर (८एच्.पी. पेक्षा कमी अश्र्वशक्तीचे) | किमतीच्या ४० टक्के किंवा रु.४५०००/-<br>किमतीच्या ४० टक्के किंवा रु.२५०००/- |
| ३ | स्वयंचलित औजारे | किमतीच्या २५ टक्के किंवा रु.४००००/-<br>स्वयंचलित रिपर,पॅडी स्ट्रान्सप्लॅन्टर, कॉटन प्लॅन्टर व यासारखी स्वयंचलीत औजारे |
| ४ | विशेष शक्ती चलित औजारे | अ) किमतीच्या २५ टक्के किंवा रु.१५०००/-<br>सरी रिजर,नांगर (टि.डी.)सिंगल/डबल, दाल मिल, रिपर (टि.डी.), क्लिनर कम् ग्रेडर,स्टबल शेव्हर, पॉवर वीडर, |
| | | ब) किमतीच्या ४० टक्के किंवा रु.२००००/-<br>रिपर ट्रॅक्टर चलीत, सीड कम् फर्टिलायझर ड्रील (टि.डी), रेजड् बेड प्लॅन्टर (टि.डी.), शुगरकेन कटर/प्लॅन्टर/पाचट कुट्टी मशिन्स्, इत्यादी, रोटाव्हेटर (टि.डी.) |
| ५ | मनुष्य चलित औजारे | किमतीच्या २५ टक्के किंवा रु.२०००/- |
| ६ | बैल चलित औजारे | किमतीच्या २५ टक्के किंवा रु.२५००/- |
| ७ | बैलचलित टुल कॅरीअर | किमतीच्या २५ टक्के किंवा रु.६०००/- मल्टि टुलबार/ कॅरीअर |
| ८ | ट्रॅक्टर/ पॉवर टिलर चलित अवजारे | किमतीच्या २५ टक्के किंवा रु.१०,०००/-<br>एम.बी./डिस्क प्लाऊ, कल्टीव्हेटर, सीड कम फ़र्टीलायझर ड्रील, पॉवर टिलर अवजारे किमतीच्या २५ टक्के किंवा रु १०,०००/- (३ ते ४ अवजारे सेट) हॅरो, कल्टीव्हेटर, सीड ड्रिल. |
| ९ | पॉवर थ्रेशर (सर्व प्रकारचे) | किमतीच्या २५ टक्के किंवा रु.१२०००/- |
| १० | डिझेल/इलेक्ट्रीक पंपसेट | किमतीच्या ५० टक्के किंवा रु.१०,०००/-<br>७.५ अश्र्वशक्ती पर्यत / ५ के डब्ल्यु. |
| ११ | कोनो वीडर | किमतीच्या ५० टक्के किंवा रु.३,०००/- |
| १२ | पिकसंरक्षण औजारे/संयंत्रे | |
| | १) मनुष्य चलित स्प्रे पंप | किमतीच्या २५ टक्के किंवा रु.८००/- |
| | २) पॉवर ऑपरेटेड् स्प्रे पंप | किमतीच्या २५ टक्के किंवा रु.२०००/- |
| | ३) ट्रॅक्टर माऊंटेड स्प्रेअर | किमतीच्या २५ टक्के किंवा रु.४०००/- |
| | ४) एरो ब्लास्ट स्प्रेअर | किमतीच्या २५ टक्के किंवा रु.२५०००/- |

वरीलप्रमाणे नमूद औजारांची प्रत्यक्ष किंमत विचारात घेवून अनुदानाची टक्केवारी व उच्चतम अनुदान मर्यादा या पैकी कमीत कमी प्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील.

http://mahaagri.gov.in/

**प्रपत्र- अ**

**सन २०१२-१३ मध्ये कृषि यांत्रीकीकरण योजनांतर्गत कृषि औजारे/सयंत्रे मागणी व पुरवठा अहवाल**

**विभाग :-** **माहे -------------- अखेर**

**जिल्हा :-**

| अ. क्र. | औजार/सयंत्रे गट | औजार/ सयंत्राचे नाव | लक्षांक | | नोंदविलेली मागणी | झालेला पुरवठा | साध्य | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | भौतिक | आर्थिक | | | भौतिक | आर्थिक |
| १ | ट्रॅक्टर | | | | | | | |
| २ | पॉवर टिलर | | | | | | | |
| ३ | स्वयंचलित औजारे | | | | | | | |
| | १ | | | | | | | |
| | २ | | | | | | | |
| | एकुण | | | | | | | |
| ३ | अ) शक्तीचलित विशिष्ठ औजारे (किंमतीच्या २५ टक्के किंवा रु.१५०००/-) | | | | | | | |
| | १ | | | | | | | |
| | २ | | | | | | | |
| | एकुण | | | | | | | |
| ४ | ब) स्वयंचलित औजारे (किंमतीच्या २५ टक्के किंवा रु.२००००/-) | | | | | | | |
| | १ | | | | | | | |
| | २ | | | | | | | |
| | एकुण | | | | | | | |
| ५ | मनुष्य चलित औजारे | | | | | | | |
| | १ | | | | | | | |
| | २ | | | | | | | |
| | एकुण | | | | | | | |
| ६ | बैलचलित औजारे | | | | | | | |
| | १ | | | | | | | |
| | २ | | | | | | | |
| | एकुण | | | | | | | |
| ७ | बैलचलित टुल कॅरीअर | | | | | | | |
| ८ | ट्रॅक्टर/पॉवर टिलर चलित अवजारे | | | | | | | |
| | १ | | | | | | | |
| | २ | | | | | | | |
| | एकुण | | | | | | | |
| ९ | पॉवर थ्रेशर (सर्व प्रकारचे) | | | | | | | |
| १० | डिझेल/इलेक्ट्रीक पंपसेट | | | | | | | |
| | १ | | | | | | | |
| | २ | | | | | | | |

http://mahaagri.gov.in/

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | एकुण | | | | | | | |
| ११ | कोनो वीडर | | | | | | | |
| १२ | पिकसंरक्षण औजारे/संयंत्रे | | | | | | | |
| | १)मनुष्य चलित | | | | | | | |
| | २)पॉवर ऑपरेटेड् स्प्रे पंप | | | | | | | |
| | ३)ट्रॅक्टर माऊंटेड स्प्रेअर | | | | | | | |
| | ४)यरो ब्लास्ट स्प्रेअर | | | | | | | |
| | एकुण बेरीज | | | | | | | |

**प्रपत्र-ब**

**सन २०१२-१३ कृषि यांत्रीकीकरण योजनेतून लाभ घेतलेले लाभार्थी अहवाल**

**विभाग :-**

**जिल्हा :-** **अहवाल माहे ------------ अखेर**

| अ. क्र. | औजार / सयंत्रे ग़ट | लाभार्थी शेतकरी | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पुरूष शेतकरी | | | महिला शेतकरी | | | एकुण | | |
| | | लहान सिमांतक | अनुसुचित जाती जमाती | एकुण | लहान सिमांतक | अनुसुचित जाती जमाती | एकुण | लहान सिमांतक | अनुसुचित जाती जमाती | एकुण |
| १ | ट्रॅक्टर | | | | | | | | | |
| २ | पॉवर टिलर | | | | | | | | | |
| ३ | स्वयंचलित औजारे | | | | | | | | | |
| ४ | अ) शक्तीचलित विशिष्ठ औजारे (किंमतीच्या २५ टक्के किंवा रु. १५०००/-) | | | | | | | | | |
| ५ | ब) स्वयंचलित औजारे (किंमतीच्या २५ टक्के किंवा रु. २००००/-) | | | | | | | | | |
| ६ | मनुष्य चलित औजारे | | | | | | | | | |
| ७ | बैलचलित औजारे | | | | | | | | | |
| ८ | बैलचलित टुल कॅरीअर | | | | | | | | | |
| ९ | ट्रॅक्टर/ पॉवर टिलर चलित अवजारे | | | | | | | | | |
| १० | पॉवर थ्रेशर (सर्व प्रकारचे) | | | | | | | | | |
| ११ | डिझेल/इलेक्ट्रीक पंपसेट | | | | | | | | | |

http://mahaagri.gov.in/

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १२ | कोनो वीडर | | | | | | | | | |
| १३ | पिकसंरक्षण औजारे/संयंत्रे | | | | | | | | | |
| | १)मनुष्य चलित | | | | | | | | | |
| | २)पॉवर ऑपरेटेड् स्प्रे पंप | | | | | | | | | |
| | ३)ट्रॅक्टर माऊंटेड स्प्रेअर | | | | | | | | | |
| | ४)यरो ब्लास्ट स्प्रेअर | | | | | | | | | |
| | एकुण बेरीज | | | | | | | | | |

**प्रपत्र -क**

**सन २०१२-१३ - कृषि यांत्रीकिकरण योजनांतर्गत तपासणी अहवाल**

**गाव-----------** **तालुका----------** **जिल्हा -----------** **माहे-----------अखेर**

| अ. क्र. | तपासणी केलेल्या लाभार्थीचे नाव व पत्ता | दिलेले औजार/ सयंत्रे प्रकार | उत्पादकाचे नाव | लॉट नंबर/ मेक नंबर | औजार /सयंत्र प्राप्त दिनांक | शासन दर निश्चिती प्रमाणे किंमत | दिलेले अनुदान रुपये | औजारा संबधी शेतक-याचा अभिप्राय | तपासणी अधिका-याचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |

**तपासणी अधिका-याचे नाव व हुद्दा** **तपासणी अधिका-याची स्वाक्षरी**

**दिनांक :-**

**( टिपः- तपासणी अधिकारी यांनी निरीक्षण टिपणी सादर करावी)**

१) असे प्रमाणीत करण्यात येतेकी वरील यादीतील आजारे लाभार्थी शेतक-यांना सुस्थितीत मिळालेले आहेत. याबाबत या र्कायालया कडून याची खात्री करण्यात आलेली आहे.

२) लाभार्थी शेतक-यांची लाभार्थी नोंद वहीत औजारे संयंत्रे यांचे मेकसह नोंद घेण्यात आलेली आहे.

३) रकना क्र.१३ मध्ये दर्शविल्या प्रमाणे अनुदानाचे धनादेश या कार्यालयास पाठविण्यात यावेत.

कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद ----------

http://mahaagri.gov.in/